


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे अंक : ६९१. वा सोमवार दि. २६ फेब्रुवारी २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जिल्हाधिकारी महोदय महसूल उपायुक्तांच्या आदेशाचा तरी आदर करा..

## २९ जानेवारी पत्रावर कारवाई करण्यात अद्यापही जिल्हाधिकारी ढिम्मच

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील महसूल विभागात बोकाळलेल्या भ्रष्टाचारावर कोणतीही कारवाई करण्यात विद्यमान जिल्हाधिकारी मोठ्या प्रमाणात कसूर करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. एकीकडे महसूल विभागात भ्रष्टाचार प्रचंड बोकाळलेला असताना त्यावर कुठलाही अंकुश जिल्हाधिकारी लावताना दिसून येत नाहीत, तर दुसरीकडे वारंवार आपल्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाला देखील जिल्हाधिकारी केराची टोपली दाखवत आहेत. खरे तर जिल्हाधिकाऱ्यांकडून होत असलेला हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन महसूल विभागात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराला निपटून काढण्यासाठी विविध पातळ्यांवर लढत देत आहे. केवळ वृत्तमालिक प्रकाशित करून आम्ही आम्ही थांबलेलो नाही, तर भ्रष्टाचाराचे इत्थंभूत पुरावे हे वरिष्ठांपर्यंत पोहोचवण्याचे कामदेखील केलेले आहे. सुरवातीला बुलढाण्यातील अधिकाऱ्यांकडे सर्व भ्रष्टाचाराची माहिती पोहोचवण्यात आली. मात्र, बुलढाण्यातील सर्व अधिकारी हे धृतराष्ट्र बनल्याचे दिसत आहेत. त्यांना आपल्याच कनिष्ठ अधिकाऱ्यांचा एक तर भ्रष्टाचार दिसत नाही किंवा त्यांच्या भ्रष्टाचारात ते सामिल आहेत. म्हणूनच महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे असोत की, भ्रष्टारात अग्रेसर असलेले तत्कालीन तहसीलदार रूपेश खंडारे असो. कुणावरही कारवाई होताना दिसून येत नाही. प्रत्येक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याकडे हे प्रकरण झटकून देत आहेत. ही स्थिती पाहून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने मग थेट अमरावती महसूल आयुक्त कार्यालयात बुलढाणा महसूल विभागातील भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची माहिती पोहचवली. या भ्रष्टाचाराबाबतची माहिती मिळाल्यानंतर महसूल आयुक्त कार्यालयाने थोडीफार का होईना परंतु हालचाल दाखवली. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या वतीने अमरावती महसूल आयुक्त कार्यालयात महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी सातगाव म्हसला येथे मंडळ अधिकारी असताना जो काही भ्रष्टाचार केला, त्याची सविस्तर माहिती पोहोचवली. टेकाळे यांनी सातगाव येथे असताना मोठ्या प्रमाणात तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन केले. त्यांनी जमीन वाटणी करताना जी काही योग्य प्रक्रिया राबवावी लागते, कागदपत्रांची पुर्तता करावी लागते आणि त्याची योग्य ती नोंदणी करावी लागते, यापैकी काहीही प्रक्रिया केली नाही. केवळ स्टॅम्प पेपरवर त्यांनी जमिमनीच्या वाटणी करून दिल्या. बरं विशेष म्हणजे ही वाटणी करतानाही त्यांनी मोठ्या प्रमाणात मनमानी केलेली आहे. त्यासंदर्भात त्यांच्याविरोधात अनेक तक्रारीही करण्यात आलेल्या आहेत. मात्र, टेकाळे हे सध्या महसूल विभागाचे जावई बनले आहेत. टेकाळे यांनी कोणताही गुन्हा केला, कोणताही नियम मोडला, शासनाला कितीही चुना लावला, कितीही नियमभंग केला, तरी त्यांच्यावर कारवाईच करायची नाही, असा चंग महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी बांधला आहे. त्यामुळे त्यांच्यावर यासंदर्भात कारवाई झालेली नाही. टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराची लक्तरं जेंव्हा महसूल आयुक्त कार्यालयात पोहाचली, तेंव्हा तेथून दि. २९ जानेवारी २०२४ रोजी एक पत्र जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आले, तसेच टेकाळे यांनी तुकडेबंदी अधिनियमाची जी काही वासलात लावली, त्याची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आदेश अमरावती महसूल आयुक्त कार्यालयातील महसूल उपायुक्त संजय पवार यांनी दिले. २९ जानेवारीला निघालेले हे पत्र काही दिवसांमध्ये बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले असणार, अशी अपेक्षा आहे. मात्र, आता महसूल आयुक्त कार्यालयातून निघून या पत्राला सुमारे एक महिन्याचा कालावधी होत आलेला आहे. परंतु अद्यापही जिल्हाधिकाऱ्यांकडून या चौकशी संदर्भात किंवा कारवाई संदर्भात कोणतीही हालचाल दिसून येत नाही. सध्या जिल्हाधिकारी किरण पाटील कोणत्या कार्यात व्यस्त आहेत माहिती नाही. परंतु त्यांना कदाचित आपल्याच खात्यात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराकडे लक्ष द्यायला वेळ नसावा. म्हणूनच की काय आपल्याच वरिष्ठांच्या आदेशाला ते केराची टोपली दाखवत आहेत. परंतु खरे तर ही बाब अत्यंत गंभीर आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात तात्काळ दखल घेऊन दोषींची चौकशी तसेच कारवाई केली पाहिजे, अन्यथा दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज खुद्द जिल्हाधिकाऱ्यांच्या विरोधात महसूल मंत्री आणि महसूल आयुक्त यांच्याकडे तक्रार केल्याशिवाय राहणार नाही. जिल्हाधिकारी असो किंवा इतर कोणीही अधिकारी यांच्याकडे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी कोणतेही कारण असले, तरी दैनिक जनसंचनलची बांधिलकी ही थेट जनतेशी आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराविरोधातील आपली कणखर भूमिका आम्ही पुढील काळातही सुरू ठेवू. जिल्हाधिकीर किंवा इतर अधिकारी हे राजकीय दबावात येऊन कारवाईला टाळाटाळ करीत आहेत हे तर उघड आहे. परंतु दैनिक जनसंचलन वसिटी न्यूज कोणत्याही दबावाला घाबरत नाही त्यामुळे या भ्रष्टाचाराचा भंडाफोड करण्याची प्रक्रिया आम्ही अविरतपणे सुरू ठेवू.



**जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील काही महिन्यांपूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालयाची पहाणी केली होती. त्यावेळी पाठीमागे महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे हेही उपस्थित होते. जिल्हाधिकारी महोदय याच महाठागवर तुम्हाला कारवाई करावयाची आहे**

अजून बरेच काही पुढील भागात

# पदवीधर मतदारसंघाचे आमदार निधीतून शालेय साहित्य व विकास निधीचे वाटप..

## आ. लिंगाडे यांच्या पारदर्शकतेचे महाविकास आघाडीकडून कौतूक !



**जनसंचलन/बुलढाणा**

पदवीधर आमदार म्हणा की शिक्षक आमदार की स्थानिक स्वराज्य संस्थेचा आमदार.. यांचा निधी कुठे येतो व कुठे जातो? हे आतापर्यंत कळतच नव्हते. परंतु धीरज लिंगाडे यांनी पदवीधर आमदार झाल्यावर या निधी वाटपात आणलेली पारदर्शकता ही कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केले. अमरावती विभागीय मतदार संघाचे पदवीधर आमदार धिरज रामभाऊ लिंगाडे यांच्या स्थानिक विकास निधी २०२३-२०२४ अंतर्गत १ कोटी ५० लक्ष रुपये बुलढाणा जिल्ह्यातील शाळांना शैक्षणिक साहित्याचे वाटप इंटरेक्टिव्ह डिजिटल पॅनल संगणक व प्रिंटर तसेच आरो फिल्टर २३० लिटर व शासकीय कार्यालयांना संगणक व प्रिंटर यांच्या वाटपाचा लोकार्पण सोहळा मोठ्या शनिवार २४ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी भवनात थाटात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्यामभाऊ उमाळकर तर प्रमुख उपस्थितांमध्ये राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्ष सौ. रेखाताई खेडेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ, दिलीपकुमार सानंदा, विजय अंभोरे, संजय राठोड, जयश्रीताई शेळके, मंगलाताई पाटील, नरेश शेळके,वसंतराव भोजने, आशिष रहाटे, दिलीप जाधव, अरविंद,कोलते, सतीश महेंद्रे, प्रा. सुनील सपकाळ, दत्ताभाऊ काकास अनिल बावस्कर, रवी पाटील शैलेश खेडकर व इतर मान्यंवर तसेच जिल्ह्यातील शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच महाविकास आघाडीतील सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील सपकाळ तर आभार प्रदर्शन सतीश महेंद्र यांनी केले,

# जलरथाद्वारे होणार जिल्ह्यात जलजागृती...

## जलरथ उपक्रमात सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा - जिल्हाधिकारी डॉ- किरण पाटील...

**जनसंचलन/ बुलढाणा**

जलरथाद्वारे जिल्ह्यामध्ये जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण तसेच जलयुक्त शिवार अभियानाची व्यापक प्रमाणात प्रचार प्रसिद्धी होणार आहे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये पाणी व स्वच्छतेची व्यापक जाणीव जागृती होणार आहे. यामध्ये सर्व संबंधितांनी सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील यांनी केले आहे. या जलरथाचा शुभारंभ सोमवारी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथून जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा विशाल नरवाडे यांच्या शुभहस्ते होणार आहे.

पाणी व स्वच्छतेची व्यापक जाणीव जागृती व्हावी, लोकांना पाण्याचे महत्व कळावे, जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची कामे तसेच अंमलबजावणी टप्प्यात असलेल्या योजना व शुद्ध पाण्याचे महत्व लोकांना कळावे या उद्देशाने तसेच स्वच्छ भारत मिशन आणि जलयुक्त शिवार या अभियानाची व्यापक प्रचार प्रसिद्धी व्हावी. या उद्देशाने भारतीय जैन संघटना आणि राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारपासून जिल्ह्यात जलरथ-द्वारे प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार आहे. यामध्ये तेरा तालुक्यासाठी तेरा स्वतंत्र जलरथ आहेत. या जलरथाच्या माध्यमातून गावागावात जाऊन पाणी, स्वच्छता व जलयुक्त शिवार याची प्रचार प्रसिद्धी करण्याचे सूक्ष्म नियोजन जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या नियंत्रणाखाली आणि भारतीय जैन संघटना यांच्या सहकार्याने जिल्ह्यात करण्यात आले आहे. सदर उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रत्येक संबंधिताने सक्रिय सहभाग घेणे गरजेचे आहे. असे आव-हन जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील यांनी केले आहे. याचे सूक्ष्म नियोजन मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या नियंत्रणाखाली जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे प्रकल्प संचालक शिवशंकर



भारसाकळे, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग रा-हुल जाधव व त्यांच्या चमुने केले आहे. सदर जलरथाच्या माध्यमातून पाणी, स्वच्छता, जलयुक्त शिवार अभियानाची व्यापक प्रचार प्रसिद्धी व्हावी, लोकांना पाणी, स्वच्छता, आरोग्य याचे महत्त्व कळावे यासाठी या जलरथाचा खूप मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे यामध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात जिल्हा परिषद गट निहाय नोडल अधिकारी निवडण्याच्या सूचना सर्व गट विकास अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील यांनी केले आहे.

# मानेगाव येथील पूर्णा नदीच्या पुलावर दुचाकीला अपघातः २ ठार

**जनसंचलन/नांदूरा**




मानेगाव २५ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास शेतातून मजुरी करुन घरी जात असतांना येरळी येथील २ युवकांचा मृत्यू झाला. सविस्तर वृत्त असे की, मानेगावकडून येरळी येते जात असतांना जुन्या पुलाच्या सुरुव-तीलाच दुचाकी घसरुन धनंजय मुकुंद वय २६ वर्षे रा. येरळी हा युवक पुलाच्या खाली नदी पात्रात पडला व दुसरा विलास जुनारे वय २७ रा. येरळी हा पुलावर पडून जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच मानेगाव येथील नितीन मिरगे व सहकारी यांनी धनंजयला पाण्यातून काढले. त्यानंतर ताबडतोब दोघांनाही नांदुऱ्याकडे दवाखान्यात रवाना केले. मात्र वाटेतच धनंजयचा मृत्यू झाला व सायंकाळी खामगाव येथे रुग्णालयात विलासनेही प्राण सोडले. दोघांचेही कुटुंब काही वर्षा आधी मामाच्या गावाला स्थानिक झाले होते व दोघेही अविवाहीत असून कुटुंबाची हलाखीची स्थिती असल्याने मजुरीला जात होते. पुलावरील त्या खड्ड्याने कदाचित दोघांचा जिव घेतला आणि असे अनेक जिव घेणे खड्डे झाडेगाव-येरळी दरम्यान आहेत. त्यावर उपाययोजना करावी अशी मागणी आहे.

# मोकाट जनावरांना पकडण्यासाठी न.प.ची मोहीम...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरात सार्वजनिक ठिकाणी फिरणाऱ्या मोकाट जनावरांचा योग्य बंदोबस्त लावण्यासाठी नगर परिषदेने काल मंगळवार २० फेब्रुवारीपासून विशेष मोहीम सुरू केली आहे. गुरेढोरे, श्वान, घोडे यासारखी जना-वरे सार्वजनिक ठिकाणी आढळल्यास नगरपरिषद आरोग्य विभागाच्या वती-ने त्यांना वाहन पिंजऱ्यात अटकाव करण्यात येणार आहे. मोहिमेत दहा कर्मचाऱ्यांचे एक चमू असणार असून वाढण्याची शक्यता आहे. विल्हेवाटेसाठी जनावरांना नगरपरिषदेच्या कोंडवाड्यात ठेवण्यात येणार असून नगर परिषदेच्या



मागील जागेत जीर्ण अवस्थेत असणाऱ्या कोंडवाड्याची डागडुजी करण्यात आली आहे. सोबतच चिखली रोडवरील गौशाळेत गायींची सुरक्षितता ठेवण्यात येणार असल्याचे नगर प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. अनेकवेळा शहरातील चौका-चौकात ठाण मांडून बसणाऱ्या मोकाट जनावरांमुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होते. त्यामुळे ही मोहीम उपयुक्त ठरणार आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते क्रिटिकल ब्लॉकचे भूमिपूजन...

**जनसंचलन/बुलडाणा**


राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालयातील क्रिटिकल ब्लॉक कक्षाचे भूमिपूजन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. त्यानिमित्ताने जिल्हा सामान्य रुग्णालयात कार्यक्रम पार पडला. यावेळी खासदार प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, तह-सीलदार आनंता पाटील, डॉ. फडणीस, डॉ. शर्मा, स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, क्षयरोग रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुशील चव्हाण, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुस-



री आदी उपस्थित होते. आहार तज्ज्ञ साहेबराव सोळंकी यांनी सूत्रसंचालन केले. बुलडाणा येथील सामान्य रुग्णालयात २३ कोटी ७५ लाख रुपये खर्चून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ५० बेडचे क्रिटिकल ब्लॉक बांधण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये आयसीयूची स्थापना करण्यात येत



आहे. याठिकाणी अत्याधुनिक सोयींनी युक्त हॉस्पिटल उभारले जाईल. यामुळे ग्रामीण भागातील जनतेला याचा विशेष फायदा होणार आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जगद्गुरू नरेंद्रचार्य महाराज ट्रस्ट लोणार शाखेच्या वतीने रक्तदान शिबीर उत्साहात



**जनसंचलन/ लोणार**

जगद्गुरू नरेंद्रचार्य महाराज ट्रस्ट नाणीज शाखा लोणार च्या वतीने २१ फेब्रुवारी २०२४ रोजी सोसे हॉस्पिटल मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती प्रा.बळीराम मापारी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून लोणार नगरीच्या नगराध्यक्षा पूनम पाटोळे तथा सोसे हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.मीना सोसे, डॉ.गजानन सोसे उपस्थित होते. जगामध्ये रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान म्हणून ओळखले जात असून या समाजात वावरत असतांना आपणास समाजाचे काही देणे लागते. हा उद्दात हेतू ठेवत जगद्गुरू नरेंद्रचार्य महाराज ट्रस्ट च्या लोणार शाखेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिराचे तिसरे वर्ष असून यामध्ये २६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. हे रक्तदान शिबीर यशस्वी होण्यासाठी लोणार शाखेचे नगर परिषदचे माजी आरोग्य निरीक्षक अशोक निचंग, रामा गंडाळ, विष्णू फुलारे, गणेश सरकटे, प्रविण काकड, श्रीधर मापारी, संजय डोंगरे,कांचन निचंग,दिपाली काकड, अवंतिका निचंग, लता काकड, अनिता फुलारे, लताबाई मोरे यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच कांतादेवी डाळे रक्तपेढी वाशिम च्या वतीने डिगांबर निरगुडे, किसन गोटे, रामेश्वर फुके यांनी सहकार्य केले.

# संग्रामपूर तालुक्यात वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेला उदंड प्रतिसाद!

## जिल्ह्याचा परिवर्तनाचा निर्धार पक्का- संदीप शेळके

**जनसंचलन/ संग्रामपूर**

वन बुलढाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा संग्रामपूर तालुक्यात सुरू आहे. विकासाचे व्हिजन घेऊन निघालेल्या संदीप शेळके यांना गावोगावी भक्कम प्रतिसाद मिळत आहे. ठीकठिकाणचे प्रेम पाहून भारावून गेल्याची भावना संदीप शेळके यांनी भाषणातून व्यक्त केली. संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा, निरोड, टुनकी, सगोड्याच्या सभा चांगल्याच गाजल्या. संग्रामपूर तालुक्यातील तामगाव, बोडखा, काकोडा ,चोंडी या गावातून पुढे निघत संग्रामपुरात मुक्काम होणार आहे. सोनाळा,निरोड टूनकी, सगोडा येथील सभेत संदीप शेळके म्हणाले, तुम्ही फक्त साथ द्या, गाव-खेड्याचा कायापालट केल्याशिवाय राहणार नाही असा शब्द त्यांनी दिला. अजूनही जिल्ह्यातल्या गावागावातील गावकरी शेकडो सुविधांपासून वंचित असल्याचे ते म्हणाले. स्वच्छतागृह नसल्याने माय माऊल्यांना मोठी समस्या निर्माण होते. मात्र लोकप्रतिनिधींनी त्याकडे लक्ष दिले नसल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली. तरुण, तरुणींना सैन्यभरतीचा सराव करण्यासाठी लागणारे सर्व साहित्य, अगदी मैदानापासून तर छोट्या क्रीडा साहित्यांपर्यंत आवश्यक त्या सर्व बाबी उपलब्ध करून देण्याचा आपण पुरेपूर प्रयत्न करणार आहोत असेही संदीप शेळके म्हणाले. गाव खेड्यातील स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बचत गटाची व्याप्ती वाढवणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. किरकोळ आजार असला तरी गावातील ग्रामस्थांना, महिलांना, चिमुकल्यांना शहरात आणावे लागते, आवश्यक सुविधापुरक आरोग्य केंद्र असले तर या समस्या सुटू शकतात असे संदीप शेळके म्हणाले. पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना कसरत करावी लागते. जर पांदन रस्त्याचे काम उत्कृष्ट दर्जाचे झाले तर ती कसरत टाळली जाईल, जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पोषण आहारापासून ते वर्ग खोल्यापर्यंत लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. कारण विद्यार्थी उद्याचे भविष्य



आहेत असे संदीप शेळके म्हणाले. संग्रामपूर तालुक्यात गावागावात शेकडो समस्या आहेत. मात्र सत्ताधाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप शेळकेंनी यावेळी केला. गावागावात संदीप शेळकेंच्या सभेला अलोट गर्दी पाहायला मिळत आहे. मुद्याचे राजकारण करून विकासाचे व्हिजन सामान्य जनतेपुढे मांडत असल्यामुळे त्यांना गाव खेड्यातील जनतेचा मोठा पाठिंबा मिळत आहे. कवठळ ,कुंभारखेड, हिंगणा, वरवट खंडेराव, पातुर्डा बु, पातुर्डा खु, टाकळी पंच, कुंद्रेगाव, कोंद्री, उकळी, आवार, वानखेड, दुर्गादैत्य या गावात यात्रा पोहचली अन परिवर्तनाचा जागर करण्यात आला. संग्रामपूरात यात्रेचा मुक्काम होणार आहे.

# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने भक्ती भावाने श्री विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव स्थानिक सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा दिं २२-२-२०२४ गुरूवार रोजी मंडळाचे सर्वे सर्वा देविदास ऊर्फ मुन्नाभाऊ शर्मा यांच्या घरी संध्याकाळी ६ वा श्री विश्वकर्मा भगवान यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर रहाणारे मंडळाचे सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्ना भाऊ शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली मागील २४ वर्षा पासून अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रम निस्वार्थ अखंडपणे सुरू आहेत संध्या ५ वा श्री सदगुरू एकनाथ महाराज व श्री विश्वकर्मा भगवान.यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विधिवत पुजन करण्यात आले आरती करून खिचडी प्रसाद वाटप करण्यात आला त्यानंतर रात्री ८ ते ११ भजनसंध्या,नामस्मरण. सदगुरू स्तोत्र चे पठण करण्यात आले



वेळी प्रसंगी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा. विनोद सुकाळे. दिलीप झापर्डे. अरूण कडवकर लालाजी सांगळे, विक्की देशमुख,अभिजित झापर्डे, अमर शर्मा,प्रेम शर्मा,सुशिलाबाई आवलकर,आशा बाई अंधारे. मंगला बावस्कर.पार्वता सुकाळे.शकुंतला ढवळे, संगिता वाघोळे. जयश्री झापर्डे. जया सुकाळे,वर्षा देशमुख. शालिनी देशमुख. बेबी आवलकर. जान्हवी शर्मा,मानवी शर्मा.व मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते मंडळाच्या वतीने वृक्षारोपण.रक्तदान. गोरगरीबांना भोजन वाटप.ब्लॅंकेट वाटप. पक्ष्यांच्या करीता पाणी पात्र वाटप असे अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रम वर्ष भर राबविल्या जातात अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

# कत्तलीसाठी जाणारे गोवंश पोलीसांनी पकडले, २ आरोपी गजाआड

**जनसंचलन/ नांदुरा**

८ गोवंश कत्तलीसाठी पिंपळगाव (राजा) येथे घेऊन जात असल्याच्या मिळालेल्या खबरेवरून २४ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजे दरम्यान नांदुरा पोलिसांनी ठाणेदार विलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खामगाव रोडवरील शासकीय विश्रामगृहाजवळ नाकाबंदी केली असता त्यादरम्यान बोलेरो पिकप गाडी क्रमांक एम एच- ३० - एबी -२९७२ मध्ये मध्ये आरोपी चालक शेख शाकीर शेख सलीम वय २८ वर्षे रा जळगाव (जामोद) व गुरांचा मालक आरोपी नदीम खान सलीम खान वय २६ वर्षे रा. पिंपळगाव (राजा) हे दोघे अवैधरित्या विनापरवाना ८ गोवंश (बैल) ना निर्दयपणे गाडीत डांबून कत्तलीसाठी घेऊन जात असल्याचे मिळून आले त्यांच्याजवळ बैल खरेदी विक्रीचे कोणतेही दाखले किंवा कागदपत्रे आढळून आले नाही. तसेच बैलांच्या अंगावर गाडीत क्रूरपणे कोंबून आणल्याने जखमा झालेल्या होत्या. त्यामुळे पोलिसांनी गोवंशाला




ताब्यात घेऊन चारा, पाणी तसेच निवाराकरिता आमसरी येथील महादेव गोरक्षण संस्थानमध्ये दाखल केले. उपरोक्त दोन्ही आरोपींविरुद्ध प्राण्यांना निर्दयपणे वागवून त्यांचा छळ करण्यास प्रतिबंध कायदा २०१५ च्या कलम ११ अन्वये गुन्हा दाखल करून त्यांच्या ताब्यातून ८ गोवंश किंमत दीड लाख रुपये व एक बोलेरो पिकप गाडी किंमत ४ लाख रुपये असा एकूण साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. ही कार्यवाही पोनि विलास पाटील, पोउनि महादेव धंदरे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे इन्चार्ज मिलिंद जवंजाळ, पोहेकॉ पृथ्वीराज इंगळे, पोकॉ रवी झगरे, विनोद भोजने, विनायक मानकर, रवींद्र सावळे व चालक शेजुळ यांनी पार पाडली.

# देवेंद्र फडणवीस यांच्यावरील बिन बुडाचे आरोप फेटाळतो मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार

**वृत्तसंस्था/मुंबई**

मराठा समाजाला न्याय मिळावा, आरक्षण मिळावे, या भूमिकेचे भारतीय जनता पार्टीने समर्थनच केले आहे. समाजाने केलेल्या आंदोलनामध्ये अथवा कायदा करताना मराठा समाजाला अधिकचे मिळावे, या त्यांच्या मागणीला सभागृहामध्ये मी स्वतः आणि आम्ही सगळ्यांनी समर्थन दिले आहे. म्हणून समाज जी मागणी मागतो आहे, त्याला पूर्ण करण्यासाठी सर्व कायदेशीर प्रक्रिया होणे आवश्यक आहे.या कायदेशीर प्रक्रियेला पूर्ण करण्याचं काम मनोज जरांगे यांनी सुद्धा हे मान्य केले होते. मा. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनीच टिकणारे आरक्षण दिले होते. मराठा समाजाला न्यायिक, टिकणारे आरक्षण देणाऱ्या देवेंद्रजींवर असे बिन बुडाचे आरोप करणे, हे आम्हाला मान्य नाही. ते असमर्थनीय आहेत. मराठा समाजाला न्याय आपण मिळवून देऊ हीच भूमिका सरकारने घेतली आहे. मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पायांशी जी शपथ घेतली त्याप्रमाणे आता दहा टक्के आरक्षण दिले आहे. समाजाचे अन्य जे विषय प्रलंबित आहेत ते प्रलंबित विषय सुद्धा चर्चेतून सोडवले जाऊ शकतात आणि सोडवले पाहिजेत. या सगळ्यांमध्ये कुठल्याही प्रकारे राजकीय रंग देणे हे मराठा समाजाला मान्य नाही. मराठा समाज राजकारण विरहित राहून समाजाला न्याय मिळण्याच्या भूमिकेवरच काम करतो आहे. आणि म्हणून याबाबतीत राजकारण करता कामा नये हीच समाजाची भूमिका आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ऐकेरी उल्लेख झाला त्याचे समर्थनच होऊ शकत नाही. उपमुख्यमंत्र्यांवर कोणीही बोलताना गांभीर्याने बोलले पाहिजे, देवेंद्रजींचा आजपर्यंतचा राजकीय इतिहास हा कुठे गैर पद्धतीने वितुष्ट निर्माण करणारा नाही. संविधान आणि कायदा याच्या पलीकडे कधी ते बोलतच नाहीत. म्हणून त्यांच्यावर अशा पद्धतीचे करण्यात आलेले बिनबुडाचे आरोप आम्ही फेटाळतो. मुळामध्ये राजकारण राजकीय पक्षाने खेळावं, कोणत्याही राजकीय पक्षाने हा प्रयत्न करू नये की, अशा पद्धतीने समाजामध्ये वितुष्ट निर्माण होईल, आणि म्हणून या सगळ्यात राजकीय वास येण्याची स्थिती का निर्माण झाली ? याचा विचार मराठा समाज नक्की करतो आहे. आणि म्हणून मला असं वाटतं ज्यांनी आतापर्यंत टिकणार आरक्षण मुख्यमंत्री पदाच्या काळात दिलं, ज्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बरोबर आणि



मा. उपमुख्यमंत्री अजितदादांबरोबर दहा टक्क्याचा आरक्षण दिले, तसेच गृहमंत्री म्हणून सुद्धा आपली जबाबदारी योग्य पध्दतीने बजावत आहेत, त्यांच्यावर आरोप करणे भारतीय जनता पक्षाला मान्य नाही. आम्ही ते फेटाळतो. याच्यात राजकारण जर कोणी करू पाहत असेल, तर त्याचा राजकीय सामना करायला आम्ही समर्थ आहोत, अशी प्रतिक्रिया मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

## रविकांत तुपकरांच्या निर्धार यात्रेला जळगाव जामोद तालुक्यात नागरिकांचा वाढता पाठिंबा...

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

रविकांत तुपकरांची २२ फेब्रुवारी पासून चालू झालेली निर्धार परिवर्तन यात्रा दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी म्हणजेच २३ व २४ फेब्रुवारी रोजी जळगाव जामोद तालुक्यात दाखल झाली. तालुक्यातील खांडवी, अकोला खु., गाडेगाव खु., गोळेगाव (नवे), टाकळी पारस्कर, कुरणगाड, भेंडवळ, चावरा, इलोरा, मडाखेड, वडशिंगी, खेर्डा बु., झाडेगाव, गोळेगाव (हुरसाळ), मानेगाव, हिंगणा मानकर (जुने), दादुलगाव (नवे), गौलखेड, आडोळ बु., मांडवा, पळशी वैद्य, पिंपळगाव काळे, जामोद गावांचा दौरा करत तुपकरांनी बैठका-कॉर्नर सभेच्या माध्यमातून गावकऱ्यांशी संवाद साधला तर खेर्डा बु. व जामोद येथे झालेल्या सभांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गावागावात नागरिकांनी या यात्रेचे जोरदार स्वागत केले. यावेळी गावकऱ्यांशी संवाद साधतांना तुपकर म्हणाले की, बुलडाणा जिल्ह्याची आत्महत्याग्रस्त व मागास जिल्हा म्हणून ओळख पुसायची आहे, त्यासाठी मला तुमच्या साथीची गरज आहे, येणाऱ्या लोकसभेत परिवर्तन घडावा, जिल्ह्याला विकासाचे मॉडेल केल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. खामगाव तालुक्यातील मांडका येथे प.पु.लक्ष्मणगिरी महाराजांचे दर्शन घेवून तुपकरांच्या निर्धार परिवर्तन यात्रेला २२ फेब्रुवारी पासून सुरुवात झाली. २३ व २४ रोजी ही यात्रा जळगाव जामोद तालुक्यात होती. या यात्रेला नागरिकांचा भरभक्कम पाठिंबा मिळतांना दिसला. शेतकरी, कष्टकरी, महिला, तरुण व शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी



ही निर्धार यात्रा असून या यात्रेच्या माध्यमातून जिल्हा पिंजून काढणार आहे. या यात्रेला नागरिकांचा मिळणारा पाठिंबा हा नागरिकांचा आपल्यावरील विश्वास आहे. बुलडाणा जिल्ह्याची राज्यपातळीवर मागास व आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळख आहे. ही ओळख आपल्याला पुसायची आहे. जिल्ह्यातील नागरिकांच्या मनात परिवर्तनाची आग आहे. येणाऱ्या लोकसभेत तुम्ही फक्त मला साथ द्या, जिल्ह्याला विकासाचे मॉडेल करून दाखवू, असा निर्धार रविकांत तुपकरांनी बोलतांना व्यक्त केला.

## दुचाकी अपघातात जामोद येथील मुलाचा मृत्यू

**जनसंचलन/जळगाव जामोद**

जामोद दुचाकी अपघातात गंभीर जखमी झालेल्या जामोद येथील २३ वर्षीय युवकाचा मुंबई येथील जेजे हॉस्पिटल येथे उपचारा दरम्यान दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना २५ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वा. च्या दरम्यान घडली. जामोद येथील पियुष सुरेश वानखडे वय २३ वर्षे हा युवक १४ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वा च्या दरम्यान नांदुरा येथून जळगाव जा. कडे दुचाकीने येत असतांना येरळी गावांजवळ दुचाकीचा अपघात होवून या अपघातात पियुष यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्यास उपचारार्थ खामगांव येथील सिल्व्हरसिटी या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले होते. तब्बल ९ दिवस उपचार करून तब्बेतीत सुधारणा न झाल्याने २२ फेब्रुवारी रोजी त्यास मुंबई येथील जे जे हॉस्पिटल येथे उपचार्थ भरती करण्यात आले होते. परंतू त्याचा २५ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वा दरम्यान मृत्यू झाला. उशीरा रात्री त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. सदर युवक हा आईवडिलांचा एकुलता १ मुलगा होता. वरील घटनेमुळे जामोदसह परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात आई वडील, १ बहीण जावाई, असा आप्त परिवार आहे.

## रेतीची अवैध वाहतूक करणारे महसूलच्या रडारवर सलग दुसऱ्या दिवशी दोन टिप्पर पकडले

**जनसंचलन/ अंढेरा**

खडकपूर्णा नदीच्या पात्रातून अवैध उत्खनन करून रेतीची वाहतूक करणारे आता महसूलच्या रडारवर आले आहे नायब तहसीलदार अस्मा मुजावर यांच्या पथकाने सलग दुसऱ्या दिवशी दोन टिप्पर जप्त केले आहेत महसूल पथकाच्या कारवाईमुळे रेती माफियांमध्ये खळबळ उडाली आहे देऊळगावराजा तालुक्यात खडकपूर्णा नदीमुळे अनेक रेती घाट आहेत यामध्ये डिग्रस, टाकरखेड भागिले, नारायण खेड, निमगाव गुरू आदींचा समावेश आहे या घाटातून रेती माफिया उत्खनन करून रेतीची वाहतूक करीत आहेत नव्याने रुजू झालेल्या तहसीलदार वैशाली डोंगरजाळ आणि उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड यांनी अवैध रेती उत्खननाला पायबंद घालण्यासाठी पथके स्थापन केली आहेत नायब तहसीदार अस्मा मुजावर यांच्या पथकाने २४ फेब्रुवारी नारायण खेड येथे रेतीची वाहतूक करणाऱ्या दोन टिप्परवर कारवाई केली. दोन्ही टिप्पर विना क्रमाकांचे आढळले यामध्ये एका टिप्पर चालक आणि मालक सागर हरिश्चंद्र वांजोळ रा. बोरगाव काकडे, ता. चिखली असून दुसरे टिप्पर चालक आणि मालक प्रताप देवीदास गवई रा. एकलासपूर तालुका रिसोड आहे. दोन्ही टिप्परमध्ये दीड-दीड ब्रास रेती आढळून आली. ही कार्यवाही उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड व देऊळगावराजा तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार अस्मा मुजावर व चालक कैलास चव्हाण यांनी केली आहे दोन्ही टिप्पर अंढेरा पोलिस स्टेशनला लावले आहेत

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958